आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२० नोव्हेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात दुपारी ११ वाजेपर्यंत १८ टक्के मतदानाची नोंद, गडचिरोलीत सर्वाधिक तर नांदेडमध्ये सर्वात कमी मतदानाची नोंद

- मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी राज्यात विविध लक्षवेधी मतदान केंद्र, काही ठिकाणी गैरप्रकारांचे आरोप

- झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या टप्प्यात ३१ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान, विविध राज्यात पोटनिवडणुकीसाठीही मतदान सुरू

- ५५वा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून गोव्यात

**आणि**

- महिलांच्या आशियाई चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारताच्या संघाचा सामना चीनशी

**<><><><><>**

राज्यात सकाळी ११ वाजेपर्यंत १८ पूर्णांक १४ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. सर्वाधिक ३० टक्के मतदान गडचिरोली जिल्ह्यात झालं. सर्वात कमी मतदान नांदेडमध्ये १३ पूर्णांक ६७ शतांश टक्के झालं.

गोंदिया, चंद्रपूर, धुळे, जालना, कोल्हापूर, नंदूरबार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये मतदानाचं प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. विधानसभा मतदारसंघांचा विचार करता आरमोरीत सर्वाधिक पावणे ३१ टक्के, अहेरीत ३० पूर्णांक ६ शतांश टक्के मतदारांनी मतदान केलं. जळगाव जिल्ह्यात पाचोऱ्यात

सर्वात कमी ८ पूर्णांक ५३ टक्के मतदानाची नोंद झाली. मुखेड, देगलूर, भिवंडी पश्चिम या मतदार संघात साडे १० टक्क्यांच्या आसपास मतदानाची नोंद झाली आहे.

नांदेड आणि पुणे जिल्ह्यात १२ ते १५ टक्के; अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, जळगाव, लातूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, नागपूर, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, सांगली, सातारा, सोलापूर, ठाणे, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यात १६ ते १९ टक्के; भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, हिंगोली, जालना, कोल्हापूर, नंदुरबार, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात २० ते २३ टक्के ; गोंदिया जिल्ह्यात २४ ते २७ टक्के मतदान झालं.

**<><><><><>**

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदानाचा हक्क बजावण्यात महिलांपेक्षा पुरुष आघाडीवर असल्याचा सर्वसाधारण कल आहे. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी मतदारांना केलेलं आवाहन आता ऐकूया…..

**होल्ड बाईट चोकलिंगम**

**<><><><><>**

राज्यात विविध ठिकाणी लक्षवेधक मतदान केंद्र तयार करण्यात आली आहेत. त्यात महिला विशेष, युवक विशेष, दिव्यांग विशेष, हरित अशा विविध

प्रकारची मतदान केंद्र आहेत. काही मतदान केंद्रांवर आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

राज्यातली पहिल्या क्रमांकाची मतदार रविता पंकज तडवी हिनं **नंदुरबार** जिल्ह्यातल्या प्रथम क्रमांकाच्या मणिबेलीतल्या केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. **वडाळा** मतदारसंघात बृहन्मुंबई महानगरपालिकेनं हरित मतदान केंद्रावर मतदानासाठी आलेल्या पहिल्या पाच मतदारांना रोप आणि फूल देऊन त्यांचं स्वागत झालं. **बीड** जिल्ह्यातल्या परळी इथं महिलांना मतदानाला प्रोत्साहित करण्यासाठी तात्पुरत्या पाळणाघरांची व्यवस्था करण्यात आली आहे.

१०३ वर्षं वयाचे स्वातंत्र्यसैनिक जी. जी. पारिख यांनी **मुंबईतल्या** मलबार हिल मतदारसंघात मतदान केलं. **मुंबईत कुर्ला** इथं कर्करोगग्रस्त ज्येष्ठ महिला मतदाराने प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं. श्रीलंकेत राहणाऱ्या मीनल रेणावीकर यांनी श्रीलंकेतून येऊन सकाळी मतदानाचा हक्क बजावला. **गडचिरोलीत** १११ वर्षांच्या फुलमती बिनोद सरकार यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी आज काही अपवाद वगळता राज्यभरात शांततेत मतदान सुरू आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत ७०४ कोटींची मालमत्ता जप्त झाली आहे.

**धुळे** जिल्ह्यात शिरपूर तालुक्यातल्या थाळनेर इथं आज पहाटे एका कंटेनरमध्ये दहा हजार किलो चांदीच्या विटा सापडल्या. याची किंमत ९४ कोटी ६८ लाख रुपये इतकी आहे. हा माल एचडीएफसी बँकेचा असून पुढील तपास केला जात आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**सोलापूर** जिल्ह्यातल्या बार्शी विधानसभा मतदारसंघातल्या एका मतदान केंद्रावर एका मतदाराने चित्रफित तयार करून ती प्रसृत केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या मतदाराचा शोध सुरू असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. **हिंगोली** जिल्ह्यातल्या कळमनुरी मतदारसंघातही असाच प्रकार आढळून आला. दोषी व्यक्तीला ताब्यात घेण्यात आलं असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**ठाणे** जिल्ह्यातल्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार केदार दिघे यांच्या विरोधात मद्य आणि पैसे वाटप केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मनसेने** शिवसेनेला पाठिंबा दिला आहे असा अपप्रचार शिवसेनेचे शाखाप्रमुख करत असल्याचा आरोप मुंबईतल्या वरळी मतदारसंघातले मनसेचे उमेदवार संदीप देशपांडे यांनी केला आहे. शिवसेनेच्या नेत्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार असल्याचं देशपांडे यांनी सांगितलं.

**मतदान** यंत्रावर आपल्या नावाच्या पुढे काळा डाग लावल्याची तक्रार अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कर्जत जामखेड मतदारसंघातले राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे उमेदवार **रोहित पवार** यांनी केली आहे. संवेदनशील केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मागणी पवार यांनी केली आहे.

**बीड** मतदारसंघातल्या धर्मापुरी इथल्या मतदान केंद्रातले सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचा प्रकार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी उघडकीला आणला. पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेरे सुरू केले.

**चंद्रपूर** जिल्ह्यातल्या चिमूर शहरात आज भाजप आणि काँग्रेसचे कार्यकर्ते समोरासमोर आल्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

**धाराशीव** जिल्ह्यातल्या परंडा शहरातल्या मतदान केंद्रावरच्या मतदान केंद्रात बिघाड झाल्यामुळं मतदान थांबवण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यातल्या रामनगर गावातल्या ग्रामस्थांनी पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मतदानावर बहिष्कार टाकला आहे.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या नांदगाव मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार सुहास कांदे यांनी अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. सुहास कांदे यांनी आपल्या समर्थक मतदारांना बसमध्ये बसवून मतदान केंद्रापर्यंत आणलं होतं, ही बस भुजबळ यांनी अडवली. त्यामुळे दोन्ही उमेदवारांच्या गटात झालेल्या वादावादीवेळी कांदे यांनी भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी दिली. दरम्यान, पोलीस आणि निवडणूक अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करत हा वाद मिटवला आणि मतदारांची ओळख पटल्यानंतरच मतदान करू दिलं जाईल, असं स्पष्ट केलं. तसंच. अपक्ष उमेदवाराने घेतलेल्या आक्षेपाची चौकशी करून कारवाई केली जाईल, असं जिल्हा पोलीस अधिक्षकांनी सांगितलं.

**<><><><><>**

बारामतीतल्या एका मतदान केंद्रावर दमदाटी करून बोगस मतदान केलं जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बारामतीचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या आई शर्मिला पवार यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने हे आरोप फेटाळून लावले. त्यानंतर काही काळ इथलं वातावरण तणावपूर्ण झालं होतं.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या मतदान केंद्रावर जाऊन या प्रकाराची पाहणी केली.

<><><><>

झारखंडमध्ये विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी कडेकोट बंदोबस्तात मतदान सुरू आहे. दुसऱ्या टप्प्यात १२ जिल्ह्यांत ३८ मतदारसंघात मतदानाला सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आहे. इथं सकाळी ११ वाजेपर्यंत ३१ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली आहे. इथं संध्याकाळी पाच वाजेपर्यंत मतदान चालेल. सुरक्षेच्या कारणांमुळे ३१ नक्षलग्रस्त मतदारसंघांमध्ये ४ वाजेपर्यंत मतदान करता येईल. दुसऱ्या टप्प्यात एक कोटी २३ लाखांहून अधिक मतदार असून ५२८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यामध्ये ५५ महिला उमेदवार आहेत.

<><><><>

५५वा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून गोव्यात सुरुवात होत आहे. पणजीत संध्याकाळी ५ वाजता या महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे. ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते मायकेल ग्रेसी दिग्दर्शित 'बेटर मॅन' या चित्रपटानं महोत्सवाची सुरुवात होईल.

<><><><>

महिलांच्या आशियाई चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारताच्या संघाचा सामना चीनशी होईल. बिहारमध्ये राजगीर इथल्या हॉकी मैदानावर संध्याकाळी पावणेपाच वाजता हा सामना सुरू होईल. तत्पूर्वी काल उपांत्य फेरीत भारताने जपानवर २-० अशी मात केली. तर उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात चीनने मलेशियाला ३-१ असं नमवलं.

**<><><><><>**

**श्रोते हो,**

राज्यभरातल्या मतदानाचा आढावा घेण्यासाठी आज संध्याकाळी ७ चे बातमीपत्र १५ मिनिटांचे प्रसारित केले जाईल. त्यानंतर सव्वा ७ ते सव्वा ८ या दरम्यान मागोवा मतदानाचा या विशेष कार्यक्रमात राज्यभरातल्या मतदानाची वैशिष्ट्य आपण जाणून घेणार आहोत. या कार्यक्रमानंतर सव्वा ८ ते साडे ८ दरम्यान राष्ट्रीय बातमीपत्र प्रसारित होईल.

**//<><><><><>//**